# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, ठाणे

क्र.निवडणूक/कक्ष-१/टे-३/जा.क्र. ३१ /२०२५
दिनांक -२०.०१.२०२५

प्रति,

मा.आयुक्त, ठाणे /नवीमुंबई / कल्याण डोंबिवली / भिवंडी निजामपूर / उल्हासनगर/ मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय:- राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम, २०२५ राबविणेबाबत.

संदर्भ :- १. अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कडील पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३७/नि-५/३३ दिनांक-०६ जानेवारी, २०२५

२. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४९१/ECI/LET/FUNC/SVEEP-I/NVD/२०२४ दि.०२.०१.२०२५

३. मा. कार्यासन अधिकारी तथा सहा.मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कडील पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३७/नि-५ दिनांक-१७ जानेवारी, २०२५

महोदय,

दि.२५ जानेवारी, २०२५ रोजी १५ वा राष्ट्रीय मतदार दिवस राज्यस्तर, जिल्हास्तर व मतदान केंद्र स्तरावर साजरा करावयाचा आहे. सदर १५ व्या राष्ट्रीय मतदार दिवसासाठी 'Nothing like voting, I Vote for sure' हा विषय (Theme) आयोगाकडून देण्यात आला आहे.

मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनूसार दिनांक २५.०१.२०२५ हा कामकाजाचा दिवस नसल्याने **दिनांक २४.०१.२०२५ रोजी आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयामध्ये मतदान शपथ घेण्यात यावी** व त्याबाबतचे फोटो व व्हिडीओ या कार्यालयास पाठविण्यास विनंती आहे. मराठी, इंग्रजी व हिंदी मधील शपथेचा नमूना सोबत जोडला आहे.

ठाणे जिल्ह्याचा जिल्हास्तरीय कार्यक्रम दिनांक २५.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन भवन, पहिला मजला जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमामध्ये मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. सदरहू कार्यक्रमामध्ये नव मतदारांना निवडणूक ओळखपत्राचे वाटप व उत्कृष्ट काम केलेल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

सदर राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम साजरा करण्याकरीता आपणांस आमंत्रित करण्यात येत आहे. तरी आपण दिनांक २५.०१.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन भवन, पहिला मजला जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे कृपया उपस्थित रहावे हि विनंती.

आपली विश्वासू

२०/१/२५

(वैशाली माने)

उपजिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे

१, जिल्हा निवडणूक शाखा, तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे (प.) ४००६०१.
दुरध्वनी क्र.: ०२२-२५४५४१४२ | ई-मेल: dydeothane@gmail.com | वेबसाईट: www.thaneelection.in

# राष्ट्रीय मतदार दिवस
# मतदारांसाठी प्रतिज्ञा

## मराठी

"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परपरांचे जतन करु आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु."

## हिंदी

"हम, भारत के नागरिक, लोकतंत्र मे. अपनी पूर्ण आस्था रखते हुए यह शपथ लेते हैं की हम अपने देश की लोकतांत्रिक परम्पराओंकी मर्यादा को बनाए रखेंगे तथा स्वतंत्र, निष्पक्ष एवं शांतिपूर्ण निर्वाचन की गरिमा को अक्षुण्ण रखते हुए, निर्भीक होकर, धर्म, वर्ग, जाति, समुदाय, भाषा अथवा अन्य किसी भी प्रलोभन से प्रभावित हुए बिना सभी निर्वाचनो में अपने मताधिकार का प्रयोग करेंगे."

## English

"We, the citizens of India, having abiding faith in democracy, hereby pledge to uphold the democratic traditions of our country and the dignity of free, fair and peaceful elections, and to vote in every election fearlessly and without being influenced by considerations of religion, race, caste, Community language or any inducement."

****************